# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/10/2023 (मंगळवार) सकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील फिर्यादीचे राहते घरी खदान नं. ०६ पाणी टाकी जवळ कन्हान येथे दिनांक ०२/१०/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सौ. संगीता सुशील केवट (निषाद) वय २४ वर्ष रा. आमली कोर (राजापुर सिग्वा डेरा) तह. तेंदवारी जिल्हा बांदा उत्तर प्रदेश ह. मु. खदान नं. ०६ पाणी टाकी जवळ कन्हान व आरोपी नामे— आकाश राजभर, वय २० वर्ष, रा. खदान नं. ०६ कन्हान ता. पारशिवनी हे एकाच मोहोल्ल्यात राहत असुन फिर्यादीचे राहते घरी आरोपी याने अनाधिकृत प्रवेश करून काही वेळा पुर्वी झालेल्या झगडयाच्या कारणावरून त्याच्या जवळील धारदार चाकुने फिर्यादीचा भाऊ नामे सुनिल चुन्नुलाल केवट, वय १९ वर्ष याच्या छातीवर वार केला व त्याला उपचार करण्याकरिता कामठी येथील सरकारी दवाखाण्यात नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याला तपासुन सांगीतले की त्याचा मृत्यु झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, ४५२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते पो.स्टे. कन्हान मो. नं. ९४२२६६६७७५ हे करीत आहे.

## अवैध रेती (गौणखनिज) ची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण १०,२०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०३/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागातील पो.स्टे. खापरखेडा हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, एक ट्रकमध्ये अवैधरीत्या रेती (गौणखनिज) ची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाकाबंदी करीत असतांना खापरखेडा ते दहेगाव रंगारीकडे जाणाऱ्या रोडवरील सब्बल नाला जवळ एक पांढऱ्या रंगाचे १० चक्का ट्रक येतांना दिसले. सदर ट्रक थांबवून ट्रकची पाहणी केली असता टाटा कंपनीचा १० चक्का ट्रक क्रमांक एम एच—४०/सी.डी.— ५९०३, चे डाल्यामध्ये रेती गौणखनीज भरून दिसुन आली. ट्रक चालकास ताब्यात घेउन त्यास त्याचे नाव गाव व ट्रक मालकाचे नाव गाव विचारले असता ट्रक चालकाने आपले नाव **दिनेश श्यामराव उपवंशी, वय १९ वर्ष रा. वंजारी भवन कोराडी** असून ट्रक मालकाचे नाव **संजय रघुवंशी, रा. वंजारी भवन कोराडी** असे सांगीतले. ट्रक चालकास ट्रकचे कागदपत्र व रेती (गौणखनिज) वाहतुकीचा परवाना (रॉयल्टी) विचारले असता त्याने ट्रक चे कागदपत्र व रेती (गौणखनिज) वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे सागीतले तसेच ट्रक मालक संजय रघुवंशी रा. वंजारी भवन कोराडी याचे सांगणे वरुन तामसवाडी रेतीघाट मधुन मजुराचे हाताने ट्रक मध्ये रेती भरुन दहेगावकडे दहेगाव रंगारी कडे घेउन जात असल्याचे सागीतले. सदर ट्रक मधील रेती (गौंणखनीज) तामसवाडी रेती घाट मधुन चोरुन आणल्याने सरकारी मालमत्तेची चोरी केल्याचे दिसुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून १) टाटा कंपनीचा १० चक्का ट्रक क्रमांक एम एच ४० सी.डी.५९०३ किंमती अंदाजे १०,००,००० /—रु तसेच ट्रकचे डाल्यात ०५ ब्रास रेती किंमती २०,०००/—रु असा एकुण वाहनासह १०,२०,००० /—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे—पोहवा राजेंद्र रेवतकर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ट्रक चालक व मालक यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कारवाई करीता पोस्टे खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे खापरखेडा हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, आशिष भुरे, पोलीस नायक विरेंद्र नरड, पोलीस अंमलदार निलेश इंगुलकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**